**<u>ठळक बातम्या</u>**

- विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला मुंबईत प्रारंभ

- पहिल्या दिवशी ५७ हजार ५०९ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर

- देशातल्या सर्व राज्यांच्या आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सहकारमंत्र्यांची मंथन बैठक केंद्रीय सहकार मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सुरु

- एसटीच्या लांब आणि मध्यम पल्ल्याच्या प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना उद्यापासून तिकीट दरात १५ टक्के सवलत

**आणि**

- राज्याचे मुख्य सचिव म्हणून राजेश कुमार यांची नियुक्ती

**<><><><>**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला आज प्रारंभ झाला. आजच्या पहिल्या दिवशी विधानसभेच्या कामकाजाला सुरुवात झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाला मंत्र्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर विविध अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. अर्थमंत्री अजित पवार यांनी ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सभागृहासमोर ठेवल्या. दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याची घोषणा विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली. त्यानंतर त्यांनी तालिका सदस्य म्हणून अमित साटम, किशोर पाटील, सुलभा खोडके, चेतन तुपे, नितीन देशमुख, संजय मेश्राम, अभिजित पाटील, समीर कुनावार आणि समाधान आवताडे यांची नियुक्ती केली. त्यानंतर संबंधित मंत्र्यांनी विविध शासकीय विधेयकं सभागृहासमोर ठेवली.

यानंतर, माजी आमदार रोहिदास देशमुख, विख्यात खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते लहानू कोम आणि समाजसेविका डॉ. श्रद्धा टापरे यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी

मांडला आणि सर्व सदस्यांनी दोन मिनिटं स्तब्ध राहून तो संमत केला. त्यानंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**<><><><>**

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या विधीमंडळात सादर केल्या. हा निधी प्रामुख्याने रस्ते, मेट्रो, पायाभूत सुविधा प्रकल्प, सिंहस्थ कुंभमेळ्याचं नियोजन आणि अंमलबजावणी, महात्मा ज्योतिराव फुले आरोग्य योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, मागास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, दुर्बल आणि वंचित समाजघटकांच्या विकासासाठी उपयोगात आणला जाणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जयंत पाटील यांनी या पुरवणी मागण्यांवर प्रतिक्रिया दिली.

**- होल्ड बाईट - जयंत पाटील –**

**<><><><>**

विधिमंडळाच्या कामकाजाला सुरुवात होण्यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी विधान भवन प्रांगणातल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

दरम्यान, विरोधी पक्षाच्या सदस्यांनी मराठीच्या मुद्द्यावरून विधान भवनाच्या पायऱ्यांवर निदर्शनं केली. त्यानंतर सदस्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केलं. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे रोहित पवार, जितेंद्र आव्हाड आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**<><><><>**

तंत्रज्ञानामध्ये इतर क्षेत्रांप्रमाणेच पशुवैद्यकीय औषधं आणि उपचारांमध्ये क्रांतिकारी बदल घडवून आणण्याची क्षमता असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. त्या आज उत्तर प्रदेशात बरेली इथे पशुवैद्यकीय संशोधन संस्थेच्या दीक्षांत समारंभाला संबोधित करत होत्या. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे पशुवैद्यकीय रुग्णालयांना सक्षम बनवता येईल, असंही त्या यावेळी म्हणाल्या.

प्राण्यांची सेवा करणं ही नैतिक जबाबदारी असून पशुवैद्यांना त्यांच्या कामाप्रति वचनबद्ध राहावं असं आवाहनही त्यांनी केलं. तसंच, त्यांनी ग्रामीण भागात पशुवैद्यकीय सेवा सुलभरित्या मिळण्याचं महत्त्वही अधोरेखित केलं. प्राण्यांना वेळेवर वैद्यकीय उपचार देण्यासाठी गावोगावी पशु आरोग्य मेळावे नियमितपणे आयोजित करण्याचा सल्लाही त्यांनी यावेळी दिला.

**<><><><>**

देशातल्या सर्व राज्यांच्या आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सहकारमंत्र्यांची मंथन बैठक आज नवी दिल्लीत केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली सुरु आहे. सहकार क्षेत्रातल्या विविध उद्दिष्टांच्या पूर्ततेचा आढावा बैठकीत घेण्यात येत आहे. जगातलं सर्वात मोठं धान्य गोदाम सहकारातून उभारण्याच्या प्रस्तावावर चर्चा होईल. अन्न सुरक्षा, आणि शेतकऱ्यांचं सक्षमीकरण या मुद्यांच्या आधारे विविध राज्य राबवत असलेल्या उपाययोजनांचा आढावा तसंच शिफारशीही लक्षात घेण्यात येतील.

**<><><><>**

एसटीच्या लांब आणि मध्यम पल्ल्याच्या प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना उद्यापासून तिकीट दरात १५ टक्के सवलत मिळणार आहे. प्रवाशांना प्रत्यक्ष तिकीट खिडकीवर, एसटीच्या अधिकृत संकेतस्थळावर, तसंच ॲपवर आगाऊ आरक्षण करता येईल. दिवाळी आणि उन्हाळी सुट्ट्यांचा गर्दीचा काळ सोडता वर्षभर ही योजना सुरू राहील. मात्र, फक्त पूर्ण तिकीट काढणाऱ्या, कोणत्याही सवलतीचा लाभ न घेणाऱ्या प्रवाशांनाच या योजनेचा फायदा घेता येईल. तसंच जादा बसेससाठी ही सवलत लागू नसेल.

**<><><><>**

रेल्वेचा आरक्षण तक्ता आता रेल्वेगाडी सुटण्याच्या आठ तास आधी तयार करण्यात यावा अशा सूचना रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी रेल्वेमंडळाला दिल्या आहेत. हा नियम टप्प्याटप्प्याने लागू होईल. यामुळे आरक्षणाच्या प्रतिक्षायादीत असलेल्या प्रवाशांना दिलासा मिळेल आणि प्रवासाकरता इतर पर्यायांचा विचार करता येईल. अशी माहिती रेल्वे मंत्रालयाने दिली. भारतीय रेल्वे पुढील महिन्याच्या १ तारखेपासून आयआरसीटीसी वेबसाइट आणि मोबाइल ॲपवर फक्त अधिकृत वापरकर्त्यांनाच तत्काळ तिकिटे आरक्षित

करण्याची परवानगी देईल. या वर्षी जुलैच्या अखेरीस तात्काळ आरक्षणासाठी ओटीपी-आधारित प्रमाणीकरण केले जाईल, अशी माहितीही मंत्रालयानं दिली.

<><><><>

आषाढी एकादशीनिमित्त आळंदी इथून निघालेल्या श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे आगमन आज सोलापूर जिल्ह्यातल्या धर्मपुरीत झालं. विठूनामाच्या गजरामध्ये माऊलींच्या पादुकांचे वारकऱ्यांनी दर्शन घेतलं. यावेळी खासदार धैर्यशील मोहिते, पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार रणजित सिंह पाटील, आमदार उत्तम जानकर यांच्यासह जिल्हाधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

<><><><>

कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर २०२० मध्ये स्थगित करण्यात आलेली कैलास मानसरोवर यात्रा आजपासून सुरू होत आहे. सिक्कीममधल्या नाथुला खिंड आणि उत्तराखंडमधल्या लिपुलेख खिंड मार्गावरून ही यात्रा सुरू होणार असून जून, जुलै आणि ऑगस्टपर्यंत ही यात्रा सुरू राहणार आहे, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे. तसंच यात्रेकरूंच्या सुरक्षिततेसाठी सिक्कीम सरकार केंद्र सरकारच्या मदतीनं पायाभूत सुविधांमध्ये वाढ करेल असंही सागितलं आहे.

<><><><>

अमरनाथ यात्रा येत्या ३ जुलैपासून सुरू होत असून जम्मू बेस कॅम्पवर यात्रेच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी सुरक्षा दलांसह बसेस रवाना करण्यात आल्याची माहिती जम्मूचे उपायुक्त अचिन कुमार वैश्य यांनी दिली आहे. ३८ दिवस चालणारी ही यात्रा बालताल आणि पहलगाम इथून सुरू होईल. यात्रेच्या सुरक्षेच्या दृष्टीने काल भारतीय लष्कर, केंद्रीय राखीव पोलीस दल, जम्मू - काश्मीर पोलीस आणि जम्मू आणि काश्मीर राज्य आपत्ती प्रतिसाद दलाने संयुक्तरित्या सराव केला. १२ हजार ७०० फुटांपेक्षा जास्त उंचीवर असलेल्या पवित्र अमरनाथ गुहेच्या मंदिराला भेट देण्यासाठी यात्रेकरूंनी मोठ्या संख्येने यावं असं आवाहनही वैश्य यांनी यावेळी केलं.

<><><><>

वरिष्ठ सनदी अधिकारी राजेश कुमार यांची आज राज्याचे मुख्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली. राजेश कुमार सध्या महसूल नोंदणी आणि मुद्रांक शुल्क तसच

वनविभागाचे अपर मुख्य सचिव म्हणून कार्यरत आहेत. विद्यमान मुख्य सचिव सुजाता सौनिक या आज सेवानिवृत्त होत असून कुमार यांची नियुक्ती करण्यात आल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

**<><><>**

सातारा जिल्ह्यातल्या उरमोडी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे धरणात पाण्याची आवक वाढली असून पाणी पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी आज धरणाच्या वक्र दरवाजातून उरमोडी नदीत १५०० क्युसेक पाणी सोडण्यात येत आहे. जलविद्युत प्रकल्पातून या पूर्वीच सुरू असलेला ५०० क्युसेक विसर्ग नदीपात्रात सुरूच आहे. त्यामुळे सांडवा आणि जलविद्युत प्रकल्प असा एकूण दोन हजार क्युसेक विसर्ग नदी पात्रात होणार आहे.

वाशीम जिल्ह्यात गेल्या आठवड्यात दोन दिवसांत सरासरी १४४.३ मि.मी. पाऊस झाला. यामध्ये जवळपास १५ हजार हेक्टर क्षेत्रावरच्या खरीप पिकाची हानी झाली. तर सात घरांची पडझड झाली वाशिम तालुक्यातल्या सात आणि मालेगाव तालुक्यातल्या एका विहिरीचे नुकसान झालं. तर १०८० हेक्टर शेतजमीन पावसाने खरडून गेली.
पुरात अडकलेल्या पाच जणांची सुटका करण्यात आली.

**<><><>**

अमेरिकन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेचं विजेतेपद भारताच्या आयुष शेट्टीनं पटकावलं आहे. हे त्याचं बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर स्पर्धेतलं पहिलं पदक आहे. तर भारताला परदेशात पुरुष एकेरीत दोन वर्षांनंतर विजेतेपद मिळालं आहे. आयोवा राज्यातल्या कौन्सिल ब्लफ्स इथं काल झालेल्या अंतिम सामन्यात त्याने कॅनडाच्या ब्रायन यांगचा २१-१८, २१-१३ असा पराभव केला.

महिला एकेरीत तन्वी शर्माला मात्र उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं. अमेरिकेच्या बेइवेन झांगबरोबर तिला २१-११, १६-२१, २१-१० असा पराभव पत्करावा लागला. तथापि बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचलेली सर्वात कमी वयाची भारतीय खेळाडू ठरण्याचा विक्रम १६ वर्षीय तन्वीच्या नावे जमा झाला आहे.

**<><><>**

टेनिस जगतातल्या प्रतिष्ठित विम्बल्डन स्पर्धेला आजपासून प्रारंभ होत आहे. १३ जुलैपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत विद्यमान विजेता कार्लोस अल्कराज, नोवाक जोकोविच या खेळाडूंसह चार भारतीय टेनिसपटू सहभागी होत आहे. यामध्ये रोहन बोपण्णा, युकी भांबरी, ऋत्विक बोलिपल्ली आणि श्रीराम बालाजी यांचा समावेश आहे. हे सर्वजण आपापल्या परदेशी जोडीदारांसोबत पुरुष दुहेरीत खेळणार आहेत.

**<><><><>**

विद्यापीठ अनुदान आयोगानं देशातल्या ८९ शैक्षणिक संस्थांना नोटीस जारी केली आहे. रॅगिंगला आळा घालण्यात अपयशी ठरल्याबद्दल ही नोटीस जारी केली असून या संस्थांमधे देशातल्या ४ आयआयटी, ३ आयआयएम आणि अलिगढ मुस्लिम विद्यापीठाचाही समावेश आहे.२००९च्या रॅगिंग प्रतिबंधक नियमावलीनुसार विद्यार्थ्यांनी नियमांचं पालन करण्याचं आणि रॅगिंगला आळा घालण्याचं लेखी वचन देणं आवश्यक आहे. ते या संस्थांनी अनुदान आयोगाला सादर केलेलं नाही असं आयोगाचं म्हणणं आहे. मुंबईच्या आयआयटी आणि आयआयएम या संस्थांना नोटीस मिळाली आहे.

**<><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगाने आपल्या अधिकृत संकेतस्थळावर २००३ची बिहार राज्यातली मतदार यादी टाकली आहे. या यादीत ४ कोटी ९६ लाख मतदारांची नावं समाविष्ट आहेत. त्यामुळे राज्यात सुरू असलेल्या मतदार याद्या सुधारित करण्याचं काम सोपं होणार आहे. सर्व बूथपातळीच्या अधिकाऱ्यांना छापील स्वरुपात तसंच ऑनलाईन पद्धतीने ही यादी मिळू शकेल. त्यामुळे जवळपास ६० टक्के मतदार आता या मतदारयादीचा वापर करून त्यांचे तपशील पडताळू शकतील. या उपक्रमामुळे बूथ पातळीवरचे अधिकारी आणि मतदार या दोघांनाही फायदा होईल, असं निवडणूक आयोगाने म्हटलं आहे.

**//<><><><>//**